थोडी गंमत -2

1) एका वर्गामधल्या निम्म्या मुली म्हणजे 14 मुली हाताला घड्याळ लावून येतात. परंतु एक तृतीयांश मुलगे घड्याळ वापरतात. मुलांची एकूण संख्या 21 आहे. तर वर्गात एकंदर मुले किती आहेत? हाताला घड्याळ न लावणार्‍या एकंदर विद्यार्थ्यांची संख्या किती?

2) एक आकड्यापासून सुरुवात करुन त्यापुढचे 15 विषम आकडे लिहा आणि त्यांची बेरीज करा.

3) देवपूजेसाठी कुठल्या वस्तू वापरल्या जातात?

4) हिरव्या रंग म्हटला की तुमच्या मनात काय येते? हिरव्या रंगाच्या किती गोष्टी तुम्हाला आठवतात?

5) देव आनंदने हिरोची भुमिका केलेल्या कुठल्याही तीन सिनेमांची नावे सांगा.
त्यांच्या सिनेमांमधील कुठली गाणी तुम्हाला आवडतात? त्यातील पाच गाण्यांचे मुखडे सांगा.

6-1) पाच बँकाची नावे सांगा

6-2) तुमच्या घराच्या जवळ कुठल्या बँकांच्या शाखा आहेत?

6-3) तुमच्या घरुन कुठल्याही एका बँकेच्या शाखेत कसे जाल ते लिहा.

6-4) बँका ग्राहकांना कुठल्या सुविधा पुरवतात?

6-5) बँकेत आपण कुठल्या कामांसाठी जातो?

6-6) आपल्याला पैसे देणार्याा बँकेच्या कर्मचार्याला काय म्हणतात?

6-7) बँकेतून पैसे आणतांना काय खबरदारी घ्यावी?

7) सुडोकू

4			2
	3	1	
	4	2	
3			1

8) नक्की खेळू शकाल हा खेळ ---

पालथ्या हातावर दोन पेन्सिली ठेवा. (पेन्सिली लांब असाव्यात. नवीन असल्यास छानच) पालथ्या हातानेच पेन्सिली वर उडवा आणि तोच हात सुलटा करुन त्या झेला. दोन पेन्सिली झेलायला जमल्यावर तीन पेन्सिली झेलण्याचा प्रयत्न करा. अशा रीतीने पेन्सिलींची संख्या वाढवत न्या. किती पेन्सिली एकदम झेलायला जमतील ते सांगायला विसरु नका. पाच, दहा की बारा?